# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. २४ मे, २०२४ दुपारी १२:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७२ वी (तातडीची) बैठक **शुक्रवार, दि.२४ मे, २०२४ रोजी दुपारी १२:३० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | अनुपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | अनुपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यापीठ संकुलातील पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेविषयी विविध प्रसार माध्यमांतून जाहिरात करण्यास आणि होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठातील विविध संकुलातील पदवी (UG) आणि पदव्युत्तर (PG) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेविषयी प्रचार, प्रसार होण्यासाठी महाराष्ट्रातील विविध माध्यम (प्रिंट मिडीया), इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया, लोकलेट, बॅनर, आकाशवाणी, Youtube चॅनल, एफ.एस.चॅनल याद्वारे जाहिरात दिल्यास अधिकाधिक लोकांपर्यंत विद्यापीठाच्या पदवी (UG) आणि पदव्युत्तर (PG) वर्गांच्या प्रवेशाबद्दल माहिती होईल.<br>या अनुषंगाने विद्यापीठाच्या पदवी (UG) आणि पदव्युत्तर (PG) वर्गाची जाहिरात विविध माध्यमांतून करण्यासाठी दि.२३/०५/२०२४ ते दि.३१/०७/२०२४ पर्यंत वर नमूद केलेल्या विविध माध्यामांतून करण्यासाठी अंदाजे रु.१० लक्ष खर्च अपेक्षित आहे. याबाबत दि.२२/०५/२०२४ रोजी प्रस्तुत कार्यालयाकडून सादरीकरण केले असता, सदर सादरीकरणावर मा. कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे पृष्ठांकन केले आहे.<br>"मान्य & Place before M.C."<br>सबब, मा. कुलगुरु महोदयांच्या उपरोक्त पृष्ठांकनान्वये राज्यातील विविध माध्यम (Print media, Electronic Media, Locket baner, आकाशवाणी, युट्युब चॅनल, एफ.एस. चॅनल) आणि विविध वृत्तपत्रातून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची जाहिरात करण्यास अंदाजे रु.१० लक्ष (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास व होणाऱ्या प्रत्यक्ष खर्च हा कुलसचिव कार्यालयाकडील "Advertisement Charges" या लेखा शिर्षकाअंतर्गत खर्ची टाकण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग (पी.जी.प्रवेश) |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यापीठ संकुलातील पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेविषयी विविध प्रसार माध्यमांतून (प्रिंट मिडीया, इलेक्ट्रॉनिक्स मिडीया, सोशल मिडीया, लोकलेट, बॅनर, आकाशवाणी, Youtube चॅनल, एफ.एस.चॅनल इ.) जाहिरात करण्यास आणि त्यासाठी येणाऱ्या रु.१० लक्ष (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) खर्चास व सदरचा खर्च हा "Advertisement Charges" या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२(१)] | प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींच्या वसतिगृहामध्ये प्रवेश क्षमता कमी असल्याने एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या संलग्नित महाविद्यालयाचे वसतिगृह भाडेतत्वावर घेण्याची बाब विचारार्थ | मुलांचे व मुलींचे वसतिगृह |
| ठराव: | विद्यापीठ परिसरातील संकुलांमध्ये विविध नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार असून सद्य:स्थितीत मुलांचे व मुलींचे वसतिगृहामध्ये प्रवेश क्षमता कमी असल्याने एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव या संलग्नित महाविद्यालयाचे वसतिगृह भाडेतत्वावर घेणे, बस सुविधा घेणे इ. साठी त्यांच्या व्यवस्थापनाशी चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव तयार करण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | |

| अ.क्र | समिती सदस्यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ). लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत<br>मा. कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ३. | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ४. | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ५. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ६. | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ७. | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे<br>संचालक, विद्यार्थी विकास विभाग | सचिव |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

२८/५/२०२४
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद